**मा.सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ याच्या अध्यक्षतेखाली तारापूर औद्योगिक परिसरातील सर्वकष पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक (CEPI) कालबध्द कार्यक्रमाबाबतची दि. ९/२/२०१६ रोजी म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, मुंबई येथे झालेल्या पर्यावरण कृती आराखडा आढावा बैठकीचे इतिवृत.**

- - - - - -

मा.सदस्य सचिव,म.प्र.नि.मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली दि. **०९/०२/२०१६** रोजी म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, सायन, मुंबई येथे तारापूर औद्योगिक परिसरातील सर्वकष पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक (CEPI) चे निवारणाबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीसाठी उपस्थित संबंधित शासकीय अधिकारी, उद्योगाचे प्रतिनिधी, सामुहिक सांडपाणी यंत्रणाचे प्रतिनिधी यांची यादी सोबत जोडली आहे.

सभेच्या प्रस्तावनेमध्ये सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी दिल्ली यांच्या अहवालानुसार, तारापुर, जि. पालघर हे औद्योगिक क्षेत्र अतिप्रदूषित म्हणून सन २००९ साली जाहिर करण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सर्वकष पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक (CEPI) कमी करण्याच्या दृष्टीने अल्प व दिर्घकालीन कृती आराखडा शासनास सादर केला होता. सदर उपाययोजनांचे सद्य:स्थितीबाबत आढावा व प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने पुरक उपाययोजना बाबत बैठक घेण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

सहसंचालक (ह.प्र.नि.), मुख्यालय यांनी कृती आराखडयाबाबतचा सद्य:स्थितीच्या अहवालचे विस्तृतपणे सादरीकरण करण्यात आले. सदर निर्देशांक कमी करण्यासाठी म.प्र.नि.मंडळाने कृती आराखडयाचा पाठपुरावा करुन, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सुचविलेल्या हवा, जल व भूमी मध्ये झालेल्या प्रदूषणाची तीव्रता कमी करण्यासाठी उद्योगाकडून उपाययोजना करुन घेण्यात आलेल्या आहेत व करण्यात येत आहेत. जल प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या २५ दशलक्ष घनलिटर क्षमतेच्या सामुहिक सांडपाणी प्रकिया यंत्रणेव्यतिरिक्त ५० दशलक्ष घनलिटर क्षमतेचा सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र प्रस्तावित असून सदरील बांधकाम पावसाळा असल्यामुळे स्थगित करावे लागले होते, परंतु नुकतेच ते पावसाळयानंतर पुन्हा सुरु केले असल्याचे सी.ई.टी.पी.च्या प्रतिनिधीकडून सांगण्यात आले. तसेच ते काम जून २०१६ पर्यंत पूर्ण होईल, असे सांगितले. त्यावर मा.सदस्यसचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी निर्देश दिले की, सदरील काम ३० एप्रिल, २०१६ पूर्वी पूर्ण करावे व त्याबाबतचा कालबध्द आराखडा (Bar Chart) मंडळाकडे सादर करावा असे बजावले. टीमा या औद्योगिक संस्थेच्या अध्यक्षांनी उपरोक्त ५० एमएलडी सीईटीपीचा डीपीआर मंजुरीसाठी निरी, नागपूर या संस्थेकडे प्रलंबित आहे तसेच उपरोक्तबाबत आय.आय.टी मुंबई कडून अहवाल प्रलंबित असल्याकारणाने टीईपीएसने शासकीय अनुदान मिळण्यासाठी प्रस्ताव अद्याप केंद्र सरकार व राज्य सरकारकडे सादर करणे शक्य होत नाही. सबब प्रकल्प पूर्ण करण्यास अद्याप ४० कोटी रुपयांची आवश्यकता आहे असे नमूद केले. सबब, मा.सदस्य सचिव यांनी उपरोक्त बाबत निरी, नागपूर, आयआयटी, मुंबई यांचे सोबत तातडीने बैठक आयोजित करण्याबाबत सहसंचालक (हप्रनि) व प्रादेशिक अधिकारी, ठाणे यांना निर्देश दिले.

सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या २५ एम.एल.डी. इतक्या क्षमतेच्या सामुहिक सांडपाणी केंद्रातून उर्त्सिजत होणा-या प्रक्रियाकृत औद्योगिक सांडपाण्याची गुणवत्ता विहित मर्यादेत येत नसल्याचे सहसंचालक (हप्रनि) यांनी सांगितले. याबाबत मा.सदस्य सचिव यांनी अतिशय तीव्र नाराजी व्यक्त करुन भविष्यात अशा प्रकारच्या त्रुटीबाबत कडक कारवाई करण्यात येईल, असे सीईटीपीच्या प्रतिनिधीस व उपस्थितीत उद्योजकांना समज दिली. बैठकी दरम्यान, उपस्थित ठळक मुद्दे व त्याबाबत झालेल्या चर्चेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

- म.औ.वि.महामंडळाच्या तारापूर औद्योगिक वसाहती अंतर्गत सांडपाणी वाहून नेणा-या बंद पाईपलाईनची ब-याच वेळा गळती होत असल्याचे निर्देशनास येते. याबाबत म.औ.वि.महामंडळाच्या अधिका-यांनी याबाबतीत त्वरीत कारवाई करुन ती बंद करण्यात येते असे नमूद केले. परंतु, याबाबत कायमस्वरुपी कार्यवाही होणे गरजेचे असल्याचे सहसंचालक (हप्रनि) यांनी नमूद केले.

- म.औ.वि.महामंडळाच्या तारापूर औद्योगिक वसाहती अंतर्गत पावसाळी पाणी वाहून नेणा-या नाली बांधणे अत्यंत आवश्यक आहे. म.औ.वि.मंहामंडळाच्या अधिका-यांनी याबाबतीत आवश्यक ती उपाययोजना करणार असल्याचे नमूद केले. तसेच म.औ.महामंडळाच्या अधिका-यांनी सदर कामाच्या निविदा मागवण्याचे काम चालू असून ते लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल असे सांगितले. सदर बाबत मा.सदस्य सचिव यांनी म.औ.महामंडळाच्या अधिका-यांना कालबध्द कृती आराखडा सादर करण्याबाबत निर्देश दिले.

- प्रादेशिक अधिकारी, ठाणे यांनी असे निर्देशनास आणून दिले की, ५० एमएलडी इतक्या क्षमतेचा सामायिक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प जून-२०१६ रोजी पूर्ण होणे प्रस्तावीत असले तरी, सागरी समुद्र विज्ञान संस्थेच्या शिफारशीनुसार प्रस्तावित प्रक्रियाकृत सांडपाण्याची विल्हेवाट / निचरा समुद्र किनाऱ्यापासून ७.१ कि.मी. अंतरावर करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सदर पाईपलाईनचे काम सुरु केले असून ते काम सन २०१८ पर्यत पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे, त्यामुळे ५० एमएलडी सामुहिक सांडपाणी प्रकल्प कार्यन्वित झाल्यानंतर प्रक्रियाकृत सांडपाण्याच्या विल्हेवाटीचा व त्यामुळे उदभवणाऱ्या पर्यावरणविषयक प्रदूषण, स्थानिक मच्छिमाराचा विरोध इत्यादी समस्या निर्माण होतील. ५० एमएलडी सामुहिक सांडपाणी प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झाले तरी प्रकल्प कार्यन्वित करण्याबाबत संमतीपत्र देता येणार नसल्याचे नमूद केले. सबब, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उपरोक्त पाईप लाईनचे काम जलद गतीने / प्राधान्यक्रमे पूर्ण करणे गरजेचे आहे. म.औ.वि.मंहामंडळाचया अधिका-यांनी सद्य:स्थितीत समुद्र किनाऱ्यापासून ०.५ कि.मी. लांबीची पाईप लाईन अस्तित्वात असून तिच्या द्वारे प्रक्रियाकृत सांडपाण्याचा निचरा केला जातो. राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेच्या शिफारशीनुसार अस्तित्वातील पाईपलाईनची लांबी ०.५ कि.मी. पासून वाढवून ७.१ कि.मी. करणे प्रस्तावित आहे व ते काम प्राधान्यक्रमाने पूर्ण करण्याचा त्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले. प्रस्तावित ५० एमएलडी सांडपाणी प्रकल्प कार्यन्वित झाल्यानंतर प्रक्रियाकृत सांडपाण्याचा निचरा / विल्हेवाट समुद्र किनाऱ्यापासून ०.५ कि.मी. अंतरावर करणे शक्य होईल. याबाबत मा.सदस्य सचिव यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उपरोक्त पाईप लाईनचे काम जलद गतीने / प्राधान्यक्रमे पूर्ण करणे गरजेचे आहे असे नमूद केले.

- तारापूर औद्योगिक क्षेत्रातील वायु प्रदूषण निर्देशांक कमी करण्यासाठी उदयोगांनी इंधन म्हणून कोळशाऐवजी स्वच्छ इंधन "पीएनजी" या गॅस इंधनाचा वापर करणे आवश्यक असल्याचे सह संचालक (हप्रनि), मुख्यालय यांनी नमूद केले. त्यासाठी गेल इंडिया या गॅस पुरवठा करणाऱ्या कंपनीने पाईपलाईन द्वारे गॅस पुरवठा उपलब्ध केला असून सर्व मोठया / मध्यम उद्योगांनी त्याची उत्पादन प्रक्रिया स्वच्छ / पर्यावरण पुरक इंधनावर रुपातंरित करणे गरजेचे आहे. सदर बाबत प्रादेशिक अधिकारी, ठाणे यांनी सांगितले की, तारापूर औद्योगिक परिसरातील एकूण ३६ मोठे / मध्यम उदयोगांना त्याची उत्पादन प्रक्रिया कोळसा या इंधनावरुन स्वच्छ / पर्यावरण पुरक इंधनावर

२/......

रुपातंरित करण्याबाबतचे निर्देश हवा (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) कायदा, १९८१ चे कलम ३१अ अंतर्गत दिनांक ११/९/२०१५ रोजी पारित करण्यात आले असून त्यांना इंधन रुपांतरासाठी तीन महिन्याचा कालावधी देण्यात आला होता. तसेच तारापूर औद्योगिक परिसरातील एकूण २१ लघु उद्योगांना त्याची उत्पादन प्रक्रिया कोळसा या इंधनावरुन स्वच्छ / पर्यावरण पुरक इंधनावर रुपातंरित करण्याबाबतचे निर्देश दिनांक ११/९/२०१५ रोजी पारित करण्यात आले असून त्यांना इंधन रुपांतरासाठी एक वर्षाचा कालावधी देण्यात आला आहे. मोठे / मध्यम उद्योगांना इंधन रुपांतरणसाठी देण्यात आलेला तीन महिन्याचा कालावधी संपला असून सद्य:स्थितीत एकूण ५ उद्योगांनी त्याची उत्पादन प्रक्रिया स्वच्छ इंधनावर रुपातंरित केली आहे. याबाबत गेलच्या प्रतिनीधींनी सांगितले की, तारापूर औद्योगिक वसाहतीतील मोठे / मध्यम उद्योग असलेल्या ५ उद्योगांना आम्ही इंधन पुरवठा केला असून लघु ग्राहक या व्याख्येमध्ये समाविष्ट असलेल्या उद्योगाना इंधन पुरवठा करण्याचा परवाना मे. गुजरात गॅस या कंपनीस देण्यात आलेला आहे. त्यामुळे त्याच्या समवेत म.प्र.नि. मंडळ बैठक आयोजित करुन त्याचा ना हरकत दाखला असल्यास लघु उद्योगाना तारापूर औद्योगिक वसाहतीत गेल कंपनीकडून गॅस पुरवठा करण्यात येईल. सदर बाबत सहसंचालक (ह.प्र.नि.) यांनी प्राधान्यक्रमाने बैठक आयोजित करुन निर्णय घेण्याबाबतचे आदेश सदस्य सचिव यांनी दिले. तद्नंतर काही उद्योग प्रतिनिधींनी कोळसा व सीएनजी गॅसच्या किंमतीत बरीच तफावत असल्याने इंधन म्हणून गॅसचा वापर चालू करणे आम्हास आर्थिकदृष्टा परवडणार नाही परिणामी कारखाने बंद होण्याची शक्यता आहे असे नमूद केले. त्यावर मा.सदस्य सचिव यांनी उद्योगांनी म.प्र.नि. मंडळाकडून पारित आदेशानुसार सीएनजी गॅसचा वापर सुरु करावा अथवा हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणेत आवश्यक ती सुधारणा करुन धुरांडयाद्वारे उत्सर्जित होणा-या धुलिकंणाचे (TPM) प्रमाण ७५ मिलीग्रॅम प्रतिघनमीटरच्या मर्यादेत आणावेत जेणेकरुन, वायु प्रदूषणविषयक निर्देशांक कमी होण्यास मदत होईल. उपरोक्त बाबत दोषी आढळलेल्या उद्योगांना कायदेशीर कारवाई करण्याबाबतचे आदेश त्यांनी प्रादेशिक अधिकारी / उप-प्रादेशिक अधिकारी यांना दिले. तसेच सह-संचालक (ह.प्र.नि) मुख्यालय यांनी कोळसा व सीएनजी गॅसच्या किंमतीतील तफावत, गेल कंपनीचे गॅस पुरवठा दर व भविष्यातील दरवाढ, इत्यादी मुद्दयाबाबत गॅस पुरवठा कंपनी व उद्योगाचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक तातडीने आयोजित करण्याबाबतचे निर्देश सहसंचालक (हप्रनि) यांना दिले.

- सहसंचालक (ह.प्र.नि.), म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय यांनी तारापूर औद्योगिक वसाहतीतील जल प्रदूषण व अतिरिक्त औदयोगिक सांडपाणी सामुहिक सांडपाणी प्रकल्पास येत असल्याकारणामुळे जल प्रदूषण होत असल्याबाबतचा मुद्दा निर्दशनास आणला. सदर बाबत प्रादेशिक अधिकारी ठाणे यांनी सांगितले की, तारापूर औदयोगिक वसाहतीमधील १०० घनमीटरपेक्षा जास्त सांडपाणी निर्माण करणाऱ्या एकूण ३७ उदयोगांना त्यांचा सांडपाणी वापर व औदयोगिक सांडपाणी निर्मिती २५ टक्के कमी करण्याबाबत निर्देश दिनांक २३/९/२०१५ रोजी देण्यात आले आहेत. सदर निर्देशाद्वारे औद्योगिक सांडपाणी मोजमाप करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मीटर व डाटा लॉगर बसवण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. सर्व उद्योगांनी त्यांचा सांडपाणी वापर व औदयोगिक सांडपाणी निर्मिती अंदाजे ३५ टक्के कमी केली असून सांडपाणी मापक यंत्रणा उभारणी केलेली आहे. तद्नंतर, सदस्य सचिव, मप्रनि मंडळ यांनी सांगितले की, तारापूर औदयोगिक वसाहतीमधील १०० घनमीटरपेक्षा जास्त सांडपाणी निर्माण करणाऱ्या उद्योगांनी सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेच्या ऑऊटलेटला स्काडा (~~SKADA~~ SCADA) या इलेक्ट्रॉनिक प्रणालीच्या धर्तीवर यंत्रणा कार्यन्वित करणे गरजेचे आहे जेणेकरुन प्रक्रियाकृत सांडपाण्याचा निचरा विहित मर्यादेपेक्षा जास्त असेल तर उपरोक्त यंत्रणा संबंधित उद्योग प्रतिनिधी / मप्रनि मंडळ यांना संदेश देईल. सदर यंत्रणा नागोठणे येथे कार्यन्वित करण्यात आलेली

असून अद्यावत यंत्रणेतील संदेश प्रणालीमुळे पर्यावरणात होणाऱ्या प्रदूषित सांडपाण्याचा निचरा / विल्हेवाट थांबविणे शक्य होईल. · SCADA connecting units discharging more than 100m³ by may 16.

- प्रादेशिक अधिकारी ठाणे, यांनी यांनी सांगितले की, दि. २२/९/२०१५ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार म.औ.वि.महामंडळास तारापूर औद्योगिक वसाहतीतील उद्योगाचा पाणी पुरवठा २५ टक्के कमी करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते जेणेकरुन सामुहिक सांडपाणी प्रकल्पातील सांडपाण्याचा अधिभार कमी होण्यास मदत होईल. परंतु, म.औ.वि.महामंडळाने याबाबत अद्याप कार्यवाही केली नसल्याचे त्यांनी सांगितले. म.औ.वि. महामंडळाच्या प्रतिनिधीनी सांगितले की, तारापूर औद्योगिक वसाहतीतील पाणी पुरवठा लहान / मोठया उद्योगाना एकत्रितपणे होत असल्याकारणाने पाणी कपात करणे शक्य होऊ शकले नाही. यावर मा. सदस्य सचिव यांनी उपस्थित म.औ.वि.महामंडळाच्या प्रतिनिधीना तारापूर औद्योगिक वसाहतीतील १०० घनमीटरपेक्षा जास्त पाण्याचा वापर करणा-या सर्व उद्योगांचा पाणीपुरवठा २५ टक्क्यांनी त्वरीत कमी करण्याबाबत निर्देश दिले.

**सर्वकष पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक (CEPI) तारापूर औद्योगिक परिसराची गुणवत्ता कमी करण्यासाठी संबंधित विभागाने करावयाची कामे:-**

| अ. क्र. | उपस्थित मुद्दे | जबाबदार संस्था | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | नविन ५० एमएलडी सीईटीपी उभारणे व कार्यान्वित करणे. | टीईपीएस — सीईटीपी व टीमा | ३० एप्रिल, २०१६ पुर्वी | प्रस्तावित ५० एमएलडी सीईटीपी कार्यान्वित करण्याबाबत माहे फेब्रुवारी-२०१६ ही कालमर्यादा दिनांक ३०/९/२०१५ रोजीच्या बैठकीत घालून देण्यात आली होती. सदर बाबत सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे बांधकाम पावसाळा असल्यामुळे स्थगित करावे लागले होते व ते काम जून २०१६ पर्यंत पूर्ण होईल, असे सी.ई.टी.पी.च्या प्रतिनिधीकडून सांगण्यात आले. त्यावर मा. सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी निर्देश दिले की, सदरील काम ३० एप्रिल, २०१६ पूर्वी पूर्ण करावे व त्याबाबतचा कालबध्द आराखडा (Bar Chart) मंडळाकडे सादर करावा असे बजावले. टीमा या औद्योगिक संस्थेच्या अध्यक्षांनी उपरोक्त ५० एमएलडी सीईटीपीचा डीपीआर मंजुरीसाठी निरी, नागपूर या संस्थेकडे प्रलंबित आहे तसेच उपरोक्तबाबत आय.आय.टी मुंबई कडून अहवाल प्रलंबित असल्याकारणाने टीईपीएसने शासकीय अनुदान मिळण्यासाठी प्रस्ताव अद्याप केंद्र सरकार व राज्य सरकारकडे सादर करणे शक्य होत नाही. सबब प्रकल्प पूर्ण करण्यास अद्याप ४० कोटी रुपयांची आवश्यकता आहे असे नमूद केले. सबब, मा.सदस्य सचिव यांनी उपरोक्त बाबत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | निरी, नागपूर, आयआयटी, मुंबई यांचे सोबत तातडीने बैठक आयोजित करण्याबाबत सहसंचालक (हप्रनि) व प्रादेशिक अधिकारी, ठाणे यांना निर्देश दिले |
| २ | २५ एमएलडीच्या सीईटीपीमध्ये सुधारणा करणे | टीईपीएस — सीईटीपी व टीमा | ३० दिवस | अस्तित्वातील सामुहिक सांडपाणी सुधारणा करण्यासाठी मागील दिनांक ३०.०९.२०१५ च्या बैठकी मध्ये १५ दिवसाची दिलेली मुदत संपली असून सध्या फक्त अंतर्गत पाईपलाईन दुरुस्ती / बदलीचे काम बाकी असल्याचे सी ई टी पी- टी ई पी एस च्या अधीका-यांनी सांगितले. मा. सदस्य सचिव यांनी सदर बाबत नाराजी व्यक्त करुन शेवटची संधी म्हणून अंतिम ३० दिवसाची मुदत दिली. |
| ३ | ड्रेनेज पाईपलाईनची गळती थांबविणे, तसेच चेंबर ओव्हरफलो होणे, इ. समस्या | म.औ.वि. महामंडळ | नियमितपणे | ड्रेनेज पाईपलाईनची दुरुस्ती नियमितपणे सुरु असून सद्य:स्थितीत शिवाजी नगर वसाहती शेजारील नाल्यात सांडपाणी जाताना दिसून येत नाही. मे. हॉटेल कॉन्टेसा शेजारी सांडपाणी संकलन टाकी उभारणी प्रस्तावित असल्याचे मऔवि महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. |
| ४ | तारापूर औदयोगित क्षेत्रात स्टॉर्म वॉटर ड्रेन बांधकामाबाबत कालबध्द आराखडा तयार करुन सादर करणे | म.औ.वि. महामंडळ | ३ महिने | म.औ.महामंडळाच्या अधिका-यांनी सदर कामाच्या निविदा मागवण्याचे काम चालू असून ते लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल असे सांगितले. सदर बाबत मा.सदस्य सचिव यांनी म.औ.महामंडळाच्या अधिका-यांना कालबध्द कृती आराखडा सादर करण्याबाबत निर्देश दिले. |
| ५ | तारापूर औदयोगिक क्षेत्रात स्टॉर्म वॉटर ड्रेन बांधणे, | म.औ.वि. महामंडळ | २ वर्ष | वरील प्रमाणे |
| ६ | तारापूर औदयोगिक क्षेत्रात उर्वरित २० कि.मी.आरसीसी पाईपलाईन बदलुन एचडीपीईची टाकण्याबाबतचा कार्यपुर्ती अहवाल | म.औ.वि. महामंडळ | २ वर्ष | म.औ.महामंडळाच्या अधिका-यांनी सदर काम प्राधान्यक्रमाने सुरु असून फक्त ६ कि.मी. पाईपलाईन बदलणे काम बाकी असल्याचे सांगितले व ते लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल असे सांगितले. सदर बाबत मा.सदस्य सचिव यांनी म.औ.वि. महामंडळाच्या अधिका-यांना कालबध्द कृती आराखडा सादर करण्याबाबत निर्देश दिले. |
| ७ | समुद्र विज्ञान संस्थेने निर्देशित केल्याप्रमाणे, ७.१ कि.मी. पाईपलाईन खोल समुद्रात | म.औ.वि. महामंडळ | २ वर्ष किंवा पर्यावरणीय अनुमतीनुसारदिलेला कालावधी | म.औ.वि.मंहामंडळाचया अधिका-यांनी सद्य:स्थितीत समुद्र किनाऱ्यापासून ०.५ कि.मी. लांबीची पाईप लाईन अस्तित्वात असून तिच्या द्वारे प्रक्रियाकृत सांडपाण्याचा निचरा केला जातो. राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेच्या शिफारशीनुसार |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | टाकणे. | | यापैकी जो कमी असेल असा कालावधी | अस्तित्वातील पाईपलाईनची लांबी ०.५ कि.मी. पासून वाढवून ७.१ कि.मी. करणे प्रस्तावित आहे व ते काम प्राधान्यक्रमाने पूर्ण करण्याचा त्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले. प्रस्तावित ५० एमएलडी सांडपाणी प्रकल्प कार्यन्वित झाल्यानंतर प्रक्रियाकृत सांडपाण्याचा निचरा / विल्हेवाट समुद्र किनाऱ्यापासून ०.५ कि.मी. अंतरावर करणे शक्य होईल. |
| ८ | तारापूर औदयोगिक क्षेत्र सीईपीआयच्या कक्षेत येत असल्याने मोठया व मध्यम स्वरुपाच्या कोळसा वापरत असलेल्या उद्योगाने त्वरीत मे.गेल इंडिया व मे.जी.एस.पी.सी या कंपन्यांशी करारनामा करुन त्वरीत सीएनजी गॅसचा वापर करणे. त्यावर मा.सदस्य सचिव यांनी एकतर सीएनजी गॅसचा वापर सुरु करावा किंवा हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणेत आवश्यक ती सुधारणा करण्यात यावी व धुरांडयाद्वारे उत्सर्जित होणा-या धुलिकंणाचे (TPM) प्रमाण ७५ मिलीग्रॅम प्रतिघनमीटरच्या मर्यादेत आणावेत. अन्यथा संबंधीत उद्योगांवर पुढील कार्यवाही करण्याचे आदेश दिले. तसेच मध्यम स्वरुपाच्या उद्योगांनी देखील | मे.गेल इंडिया लि. मे.टीमा, मोठया व मध्यम स्वरुपाचे कारखाने/ प्रादेशिक अधिकारी,म.प्र.नि.मंडळ | १५ दिवस | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | वरीलप्रमाणे कार्यवाही करणे. | | | |
| ९ | तारापूर औद्योगिक वसाहतीतील प्रदुषणकारी प्रमुख उद्योगांनी इलेक्ट्रॉनिक फ्लो मीटर व डाटा लॉगर बसविणे व नियमितपणे तपासणी करणे. | म.प्र.नि.मंडळ | १ महिना | - |
| १० | म.औ.वि.महामंडळा कडून सद्य:स्थितीत १०० घनमीटरपेक्षा जास्त पाणी वापर करणा-या कारखान्यांचा पाणी पुरवठा २५ टक्के इतका पाणी कमी करणे. | म.औ.वि. महामंडळ | ७ दिवस | दि.३०.०९.२०१५ च्या बैठकी मध्ये मा. सदस्य सचिव यांनी म. औ.वि. महामंडळास तारापूर औद्योगीक वसाहतीमधील उद्योगांना पुरविण्यात येणा-या पाणी पुरवठयामध्ये २५ टक्के कपात करण्यात यावी असे नमुद केले होत. परंतू या बाबत म. औ.वि. महामंडळा कडून अंमलबजावणी न झाल्याने मा. सदस्य सचिव यांनी उपस्थीत म. औ.वि. महामंडळाच्या प्रतीनिधीस १०० घन मीटर प्रतीदिन इतका पाणी वापर करणा-या उद्योगांच्या पाणीपुरवठयामध्ये २५ टक्क्याची कपात त्वरीत करण्यात यावी असे नमुद केले |
| ११ | बँक हमी - ज्या उद्योगांनी प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसवली आहे अशा उद्योगांचा आढावा घेऊन त्या उद्योगांची बँक हमी उद्योगास परत करणे. ज्या उद्योगांने प्रदूषण नियंत्रण यंत्रणा चालवणेबाबत बँक हमी दिली आहे अशा उद्योगांची बँक हमी वाढवणे किंवा याबाबत योग्य तो निर्णय घेणे | म.प्र.नि.मंडळ, ठाणे/मुख्यालय | ३ महिने | - |

सह संचालक (हप्रनि), म.प्र.नि.मंडळ, मुंबई यांनी असे सूचित केले की, सर्व भागधारकांनी (Stake holders) विशेष बाब म्हणून वरीलप्रमाणे अंमलबजावणी करावी व त्याचा अहवाल उप प्रादेशिक कार्यालय, तारापूर / प्रादेशिक कार्यालय, ठाणे व मुख्यालय यांच्याकडे सादर करण्यात यावा.

बैठकीच्या समारोपा दरम्यान मा.सदस्य सचिव व सहसंचालक (हप्रनि) म.प्र.नि मंडळ मुख्यालय यांनी उपस्थित अधिकारी व उदयोगांच्या प्रतिनिधींना असे सूचित केले की, तारापूर औदयोगिक परिसरातील प्रदूषणास आळा घालण्यासाठी सर्व संबंधीतांनी आपआपल्या स्तरावर शीघ्र गतीने कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे नमूद केले परंतु, जे उदयोग नियमांचे पालन करणार नसतील अशा उदयोगांवर कठोर कारवाई करण्यात येईल असे नमूद केले. बैठकीच्या समारोपा दरम्यान सहसंचालक (हप्रनि) यांनी सर्व उपस्थितांचे आभार प्रकट करुन पुढील बैठक मे २०१६ च्या मध्यावर घेण्यात येईल असे नमूद करुन बैठक संपल्याचे जाहिर केले.

**सह संचालक (हप्रनि)**
म.प्र.नि.मंडळ, मुंबई

**सदस्य सचिव**
म.प्र.नि.मंडळ, मुंबई

# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

## Attendance Sheet

**Review meeting on implementation of progress of critically polluted areas action plan (CEPI) of Tarapur on 09/02/2016 at 03.15 PM**

| Sr. No. | Name and Designation | E-mail | Mobile No. | Signature |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | V. M. Motghare | | | [signature] |
| | | | | |
| | | | | |
| 5) | A. F. Deshmane<br>I/c R.O. Thane | RO thane@mpcb.gov.in | 9869444764 | [signature] |
| 6) | S. L. Waghmare | | 9969006861 | [signature] |
| 7 | P. R Malav<br>NIPUR Chemical | Plant Manager<br>prm@nipurchemicals.com | 9320091521 | [signature] |
| 8. | ML Gupta | Comm. Manager | 9370148723 | [signature] |
| 9. | Rajendra Thanawala | Director<br>rajendra.thanawala@sifycom.com | 9322122278 | [signature] |
| 10 | N. Poddar | Poddar@geniter.com | 9320212070 | [signature] |
| 11. | GIRISH GALINDE | girishg@gail.co.in | 9820407382 | [signature] |
| 12. | Vivek Wathodkar | vivekw@gail.co.in | 9930999065 | [signature] |

# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

## Attendance Sheet

**Review meeting on implementation of progress of critically polluted areas action plan (CEPI) of Tarapur on 09/02/2016 at 03.15 PM**

| Sr. No. | Name and Designation | E-mail | Mobile No. | Signature |
|---|---|---|---|---|
| | Abhishek Pandey Engineer | abhishek4528 @gmail.com | 9960128242 | [signature] |
| | P. J. Dalal Executive EHS | p.dalal@sumichemindia.com | 9923754208 | [signature] |
| | Alok Singh G com. manager SIYARAM SILK MILLS LTD. G1/1, MIDC TARAPUR | singhalok@siyaram.com | 9762300733 | [signature] |
| | Sanjay Manager | [illegible] @yahoo.co.in | 9930670376 | [signature] |
| | Janamejay Singh Sr. offices HO | Janamejaysingh @siyaram.com | 9321846221 | [signature] |
| | G.M. Syntex Pvt Ltd | malhotra@ gmsyntex.com | 9820341342 | [signature] |
| | T.C. Bibin Rajesh | trajesh@gail.co.in | 7774011199 | [signature] |
| | Dinesh Mendhwekar | | 9819046846 | [signature] |
| | P.M. Katarya | Siyaram. | 9823144309 | [signature] |
| | M.S. Kallcudki | eethanadh@ midcindia.org | 8692978999 | [signature] |
| | R. P. Patil | [illegible] @midcindia.org | 8108092090 | [signature] |
| | | | | |

# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

## Attendance Sheet

**Review meeting on implementation of progress of critically polluted areas action plan (CEPI) of Tarapur on 09/02/2016 at 03.15 PM**

| Sr. No. | Name and Designation | E-mail | Mobile No. | Signature |
|---|---|---|---|---|
| 1 | Ashok Saraf | ashok@caas.co | 9820611119 | |
| 2 | D.K. Raut | dkraut@teshava.com | 9821220260 | |
| 3 | Ratesh P | rajeshponugupati@lupin.com | 9823334974 | |
| 4 | Girish Wighe | girish.wighe@jsw.in | 9970390550 | |
| 5 | A.M. Shaikh | Aarti Drugs Ltd. E-1 | 9867532682 | |
| 6 | Vikas Chavan | Bombay Rayon Fashion Ltd | 7798887737 | |
| 7 | Velmurugan - J | Bombay Rayon Fashions Ltd | 8007774562 | |
| 8. | Sanjeev Kapoor. | Indux Global (P) Ltd. | 9871668264 | |
| 9 | Rajesh Kr Singh | rajeshksingh@tatasteel.com | 7798047869 | Rajesh. |
| 10 | C.B. Singh | chandrabhan.singh@elandindia.com | 9272091144 | |
| 11 | Mukesh Mistry | mukesh.mistry@viraj.com | 9049991145 | |
| 12 | Mr. Marathe | tukaram.marathe@viraj.com | 9049991144 | |

# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

## Attendance Sheet

**Review meeting on implementation of progress of critically polluted areas action plan (CEPI) of Tarapur on 09/02/2016 at 03.15 PM**

| Sr. No. | Name and Designation | E-mail | Mobile No. | Signature |
|---|---|---|---|---|
| | G. S. Jadhav | teps123_cetp@yahoo.co.in | 9819288524 | [signature] |
| | Nayan Kambli VP-finance | nayan@mandhana.com | 9324686544 | [signature] |
| | R.S. Ratwal G.M. | D'Decor Exports Pvt Ltd G-7/1 | 7898899063 | [signature] |
| | S.L. Tarwelkar G.M. | DDECOR G-15 | 9823448179 | [signature] |
| | Abbasi Jhunjhunwala Dep | D'Decor | 7507647868 | [signature] |
| | Sandeep Galagali DGM | DDECOR | 9819868583 | [signature] |
| | Avinash D. Pawar EMS officer | avinash.pawar@aartigroup.com | 9637604841 | [signature] |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |